10

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): नंदुरबार **P.S.**(ठाणे): शहादा

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0088 **Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 03/03/2023 06:49

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार
**Time Period** (कालावधी): पहर 7
**Date From** (दिनांक पासून): 02/03/2023
**Date To** ( दिनांक पर्यंत): 02/03/2023
**Time From** (वेळेपासून): 19:31 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 20:22 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 03/03/2023 **Time** (वेळ): 05:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 007
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 03/03/2023 06:13 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
उत्तर, 2 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): सार्वजनिक बांधकाम विभाग,शहादा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विश्वनाथ प्रतापसिंग गिरासे

(b) **Father's/Husband's Name** (वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.** (पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | खैरवे, ता शहादा जि नंदुरबार,शाहदा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | खैरवे, ता शहादा जि नंदुरबार,शाहदा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9420968004

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश प्रतापराव पाटील | | | 1. सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा,शाहदा,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3,50,000/ रुपये (तीन लाख पन्नास हजार रुपये) | 350,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य (रु. मध्ये)):

350,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 03/03/2023

माझे नाव श्री. विश्वनाथ प्रतापसिंग गिरासे, वय-35 वर्षे, व्यवसाय-शासकीय ठेकेदार, मुळ रा. मु.खैरवे, ता. शहादा जि. नंदुरबार, मो.नं. 9420968004.

समक्ष हजर होवुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी पत्नी अपुर्वा, मुलगी काव्या अशांसह एकत्र राहतो. मी शासकीय बांधकाम ठेकेदार म्हणून कामकाज करुन आमच्या परिवाराचा उदरनिर्वाह करतो.

दिनांक 02/03/2023 रोजी पोलीस उप अधिक्षक श्री चौधरी साहेब यांना मी फोनव्दारे मला अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे तक्रार दयावयाची असल्याने आपण शहादा येथे यावे अशी विनंती केल्याने ते पथकासह मी सांगितलेल्या ठिकाणी कल्पना नगर, शहादा येथे आले. त्यावेळी खाजगी वाहनातून आलेल्या पोलीस उप अधिक्षक श्री चौधरी साहेब यांनी माझी, त्यांचेसोबत असलेले दोघेही पंच व अॅन्टी करप्शन ब्युरोचा उर्वरित स्टाफ अशांची ओळख करुन दिली व सोबत हजर असलेले 1) पंच श्री.राहुल मच्छिंद्र धनगर, वय-30 वर्षे, व्यवसाय-सरकारी नोकरी, मंडळ कृशी अधिकारी, तालुका कृशी अधिकारी कार्यालय,शहादा जि. नंदुरबार 2) पंच श्री. राहुल दिलीप खेडकर, वय-30 वर्षे, व्यवसाय-सरकारी नोकरी, कृशी सहाय्यक, तालुका कृशी अधिकारी कार्यालय,शहादा जि. नंदुरबार अशांची ओळख करुन दिली. त्यानंतर श्री चौधरी साहेब यांनी व दोन्ही पंचानी मला माझे तक्रारी विशयी तोंडी विचारपुस केली, मी माझी तोंडी तक्रार सांगितली असता पोलीस उप अधिक्षक श्री चौधरी साहेब यांनी मला सदरची तक्रार लेखी स्वरुपात दयावयास सांगितली. मी सदरची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन दिली ती "मी सन 2012 सालापासुन शासकीय नोंदणीकृत ठेकेदार म्हणून शासनाचे विविध विभागांचे काम करीत असतो. मी व माझे मोठे बंधू श्री जयदिप प्रतापसिंग गिरासे असे दोघे मिळून आम्ही 'साई कन्स्ट्रक्शन' या नावाने फर्मची नोंदणी केलेली असून 'साई कन्स्ट्रक्शन' या नावाने आम्ही शासनाचे रस्त्याचे व इतर बांधकामाचे ठेके घेत असतो.

आमच्या 'साई कन्स्ट्रक्शन' या नावाने केलेल्या कामाच्या बिलाबाबत सर्व कामकाज मी स्वतःच बघत असतो. आम्ही घेतलेल्या कामांपैकी काही कामे पुर्ण झाली असून काही काम चालू आहेत. तसेच सध्या तीन वेगवेगळ्या रस्त्यांचे कामाचे कार्यारंभ आदेश आम्हाला मिळणे बाकी आहे.

तसेच मागील 6 महिने ते एक वर्षाचे कालावधीत आमच्या साई कन्स्ट्रक्शन कंपनीने रस्त्यासंबंधीत तीन कामे पुर्ण केलेली आहेत, परंतू त्या कामाचे बिल सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभाग शहादा यांच्याकडे बाकी आहे. आम्ही पुर्ण केलेल्या कामांपैकी

1. सोनगीर-दोंडाईचा-शहादा-धडगाव-मोलगी रस्ता प्ररामा-1 कार्यारंभ आदेश जा.क्र.1177/2022 दि. 14.03.2022,
2. सारंगखेडा-टेंभा-खैरवे-तोरखेडा रस्ता जा.क्र.569/2022 दि.10.02.2022.
3. सोनगीर-दोंडाईचा-शहादा-धडगाव रस्ता प्ररामा-1 कार्यारंभ आदेश जा.क्र.4651/2022 दि.02.12.2021

अशी तिन्ही कामे आमच्या कंपनीने पुर्ण केलेली आहेत, नमुद तिन्ही कामांचे मिळून 4,09,79,285/- रूपये एवढी रक्कम होत असून यापैकी 17,00,000/- रूपये आम्हाला परत मिळाले असून आमचे 3,92,79,285/- रूपये एवढी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा या कार्यालयाकडे प्रलंबित आहे. तसेच बिलाची रक्कम शासकीय निधीतून देण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग शहादा यांना आहेत. तसेच आमच्या रस्त्याच्या कामाबाबतचे 3 कार्यारंभ आदेश सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांचेकडे प्रलंबित आहेत.

मी मागील सहा महिन्यांपासून आम्ही पुर्ण केलेल्या कामांबाबतच्या बिलाची प्रलंबित रक्कम 3,92,79,285 रूपये व मंजुर असलेल्या तिन्ही कामांचे कार्यारंभ आदेश मिळणेकामी वेळोवेळी श्री महेश पाटील साहेब, कार्यकारी

अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग, षहादा यांचेकडे पाठपुरावा व अनेकवेळा विनंती केलेली आहे. परंतु श्री महेष पाटील साहेबांनी आमचे पुर्ण केलेल्या कामांबाबतच्या बिलाची रक्कम आम्हाला मंजुर केली नाही. तसेच तीन कामांचे कार्यारंभ आदेष सुध्दा आम्हाला दिलेले नाहीत. मी जेव्हा-जेव्हा श्री महेष पाटील साहेबांना भेटलो तेव्हा तेव्हा त्यांनी प्रलंबित बिलाच्या रकमेच्या 10 टक्के व कार्यारंभ आदेष काढणेकरीता त्या रकमेच्या 1 टक्के अषा रकमेची माझेकडे मागणी केलेली आहे. आम्ही पुर्ण केलेल्या कामाची रक्कम व मंजुर असलेल्या कामांच्या तिन्ही वर्क ऑर्डर काढणे अषा सर्व कामांसाठी त्यांनी एकूण 43,00,000/- रूपयांची लाचेची रक्कम माझेकडे समक्ष मागणी केलेली आहे.

मागील आठवडयात सुध्दा मी श्री महेष पाटील साहेबांना भेटलो तेव्हा त्यांनी मला सांकेतीक भाशेत टोलची रक्कम आधी जमा करा असे सांगून त्यांच्या मोबाईलच्या कॅल्क्युलेटर मध्ये 43,00,000/-रूपये दाखवून आधी हे सर्व जमा करा असे मला समक्ष सांगितले होते. श्री महेष पाटील साहेब अनेकवेळा प्रत्यक्ष पैषांबाबत न बोलता सांकेतिक भाशेत टोल, एन्ट्री, टक्का असे षब्द वापरत असतात.

माझी खात्री झाली की, श्री महेष पाटील साहेब मागणी करीत असलेली 43,00,000/- रूपये हि रक्कम कोणतीही षासकीय फि नसून लाचच आहे. तरी वरिलप्रमाणे माझी त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही. तसेच त्यांचेत व माझेत काहीएक खाजगी वाद-विवाद नसुन उधार उसनवारीचा व्यवहार नाही. यामुळे मी आज दि. 02.03.2023 रोजी नंदुरबार अॅन्टी करप्षन ब्युरोचे पोलीस उप अधिक्षक श्री चौधरी साहेब यांना फोन करून माहिती दिली आहे. यानंतर चौधरी साहेब माझी तक्रार घेण्यासाठी त्यांच्या पथकासह व दोन षासकीय पंचांसह षहादा येथे आलेले आहेत.

तरी माझेकडून 43,00,000/- रूपये एवढया लाचेच्या रकमेची मागणी करणारे सार्वजनिक बंाधकाम विभाग, षहादा येथील कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील यांचेविरूध्द माझी तक्रार आहे. तसेच श्री महेष पाटील यांनी मला इतरांमार्फत फोन करून आज भेटण्यासाठी बोलाविले असून त्यांना पैसे कोठे?, कधी? व केव्हा? दयावयाचे याची बोलणी करण्यासाठी मला जावयाचे आहे. तरी आपण त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.'

सदर तक्रार दिल्यानंतर मी, दोन्ही पंच व पोलीस उप अधिक्षक श्री चौधरी साहेब अषांनी सदर तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री चौधरी साहेब यांनी मला व पंचांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीची माहिती दिली.

या तक्रारीबाबत पडताळणी करणे आवष्यक असल्याने श्री चौधरी साहेब यंाचे आदेषान्वये पोना/मराठे यांनी माझे षर्टचे आतील बनियानला डिजीटल व्हॅाईस रेकॉर्डर लावून ते सुरु केले. मी व पंच नं.1 श्री. राहूल धनगर यांचेसह माझेकडील चारचाकी वाहन स्वीफ्ट व्हीडीआय क्र. एम.एच. 46-ए यु 2762 हिचेने कल्पना नगर मधून पीडब्लुडी कार्यालयाजवळील कार्यकारी अभियंता यांचे षासकीय निवासस्थान येथे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांना भेटण्यासाठी निघालो. ती वेळ 16ः20 वाजेची होती. परंतु कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब हे जेवण करून आराम करीत आहेत बाबत तेथील षिपाई यांनी कळविल्याने आम्ही लागलीच माझे राहते घरी कल्पना नगर येथे परत आलो. तेव्हा पोना/अमोल मराठे यांनी माझे षर्टचे आतील बनियानला लावलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ते श्री चौधरी साहेबांचे ताब्यात दिले. व्हॉइस रेकॉर्डर बंद करावयाची वेळ 16ः27 वाजेची होती.

त्यानंतर पुन्हा मी फोनव्दारे माहिती घेतली असता कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब हे उठलेले असलेबाबत कळाल्याने श्री चौधरी साहेब यंाचे आदेषान्वये पोना/मराठे यांनी माझे षर्टचे आतील बनियानला डिजीटल व्हॅाईस रेकॉर्डर लावून ते सुरु केले. मी व पंच नं.1 श्री. राहूल धनगर यांचेसह माझेकडील चारचाकी वाहन स्वीफ्ट व्हीडीआय क्र. एम.एच. 46-ए यु 2762 हिचेने पुन्हा कल्पना नगर मधून पीडब्लुडी कार्यालयाजवळील कार्यकारी अभियंता यांचे षासकीय निवासस्थान येथे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांना भेटण्यासाठी निघालो. ती वेळ 17ः04 वाजेची होती. थोडयाच वेळाने मी व पंच नं. 1 श्री. राहूल धनगर असे माझे राहते घरी कल्पना नगर येथे परत आलो. तेव्हा पोना/अमोल मराठे यांनी माझे षर्टचे आतील बनियानला लावलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून ते श्री चौधरी साहेबांचे ताब्यात दिले. व्हॉइस रेकॉर्डर बंद करावयाची वेळ 17ः35 वाजेची होती.

त्यानंतर श्री चौधरी सर व पंच नं.1 श्री. धनगर यांना पंच नं.2 श्री.खेडकर यांचेसमक्ष विचारले की, ''आपणास व तक्रारदार अषांना कल्पना नगर ते पीडब्लुडी कार्यालयाजवळील कार्यकारी अभियंता यांचे षासकीय निवासस्थान येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांची भेट घेण्यासाठी रवाना केल्यापासून ते परत येईपावेतो काय काय घटना घडली? असे विचारता पंच नं.1 श्री धनगर यांनी सांगितले की, ''मी व तक्रारदार असे पीडब्लुडी कार्यालयाजवळील कार्यकारी अभियंता यांचे षासकीय निवासस्थान येथे सार्वजनिक

बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांचेशी तक्रारदार यांचे रस्त्याचे बांधकामाचे पैसे मिळणेबाबत विनंती केली असता सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांनी सांकेतीक भाषेत नवीन तीन कामांचे कार्यारंभ आदेष काढून देण्याचे मोबदल्यात नमुद कामाचे एकुण रकमेच्या 0.75 टक्के रक्कम घेवून आल्यानंतर लगेच सदरचे आदेष काढून देणेबाबत सांगितले तसेच मागील कामांचीही टक्केवारी लवकर आणून देणेबाबत सांगितले."

त्यानंतर आम्ही कल्पना नगर येथील माझे राहते घरी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषणाची रिप्लेप्ट ऐकली व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांनी सदरचे पैसे तात्काळ आजचे आज आणून देणेबाबत सांगितल्याने लागलीच वेळेअभावी यशस्वी सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरल्याने पडताळणी व सापळापुर्व पंचनामा करण्यात आला.

सदरचे व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषणात माझे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांचेशी बोलणे झाले असून त्यात माझे कार्यारंभ आदेष काढून देण्यासाठी 0.75 टक्के म्हणजेच 3,50,000/- रूपये लाचेची मागणी करुन सदरची रक्कम पीडब्लूडी कार्यालयातील धनसिंग यांचेकडे देणेबाबत सांगितल्याचे निष्पन्न झालेबाबत सर्वांची खात्री झाल्याने लागलीच सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर मी माझे कामाचे बचतीचे पैषातील 3,50,000/-रुपये दोन्ही पंच व श्री चौधरी साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यात पाचशे रूपये दराच्या 700 चलनी नोटा असून त्यांचे क्रमांक पडताळणी व सापळापुर्व पंचनाम्यांत नमुदप्रमाणे आहे. त्यानंतर माझे राहते फ्लॅटमध्ये सदर नोटांना आपल्या सूचनेवरुन पोना/देवराम गावीत यांनी बॅगेतून एक सिलबंद पाकीट आणि एक दिवा/टॉर्च आमचे समोर काढले तेव्हा सदर दिवा हा अल्ट्राव्हॉयोलेट दिवा आणि सिलबंद पाकीटात अॅन्थ्रासिन पावडरची बाटली असल्याबाबत श्री चौधरी साहेब यांनी त्याचे गुणधर्म व वैषिष्टयाबाबत सांगितले. त्यानंतर प्रथम नैसर्गिक प्रकाषात आणि त्यानंतर माझे घराचे दरवाजे बंद करुन अंधार केला, त्या अंधारात अल्ट्राव्हॉयोलेट बॅटरीचे प्रकाषात आपले दोन्ही पंचांचे, आपल्या स्टाफचे असे सर्वांचे हात, कपडे व मी लाच देणेकामी हजर केलेल्या 3,50,000/- रूपये त्यात पाचषे रूपये दराच्या 700 चलनी नोटा अषा नोटा तपासल्या. सर्व काही नैसर्गिक नेहमीप्रमाणे दिसून आले. त्यानंतर घरात पूर्ववत उजेड करण्यात आला. वरील नोटांना पोना/देवराम गावीत यांनी त्या बाटलीचे झाकण उघडून त्या बाटलीतील अॅन्थ्रासिन पावडर कापसाच्या बोळ्याने एका पांढरे कागदावर दोन्ही बाजूने क्रॉस आकाराने लावली सदर नोटा माझे घराचे दरवाजे व काचा बंद करून अंधार केला त्या अंधारात अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याच्या बॅटरीचा प्रकाष टाकून तपासले असता, सदर नोटांवर फिकट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर पोना/देवराम गावीत यांनी सदर नोटा माझेकडे असलेल्या प्लॅस्टीकचे पिषवीत ठेवल्या. त्यानंतर पोना/देवराम गावीत यांना सापळा पार्टीतून वगळण्यात आले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री चौधरी साहेब यांनी मला पुन्हा सु त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री चौधरी साहेब यांनी मला पुन्हा सुचना दिल्या की, कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील हे लाचेची रक्कम मागत नाही तोपर्यंत त्यांना ती रक्कम देण्यात येवू नये, तसेच प्रलंबित बिल व नविन कार्यारंभ आदेष बाबत व मागत असलेल्या लाचेच्या रक्मेबाबत सविस्तर बोलणी करावी, मला सदरच्या सुचना देवून त्यांनी त्यांचे ताब्यातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पंचासमक्ष नवीन 16 जी.बी.चे कोरे मेमरी कार्ड टाकून व्हॉईस रेकॉर्डर आपले सुचनेनुसार पोना/अमोल मराठे यांनी माझे षर्टचे आतील बनियनला लावून सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर शहादा शहरातील पीडब्लूडी कार्यालयाजवळ माझे चारचाकी वाहनात लावुन सुरु केले. ती वेळ 19:31 वाजेची होती.

त्यानंतर मी व पंच नं. 1 श्री. धनगर, माझा चालक गौरव जमादार व पोना/अमोल मराठे असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांना त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी पीडब्लुडी कार्यालय, षहादा येथे माझेकडील स्वीफ्ट चारचाकी वाहनाने गेलो. तसेच आपण, पोनि/वाघ, पंच क्रमांक 02, पोहवा/विजय ठाकरे व पोना/देवराम गावीत असे आपलेकडील नेक्सॉन या चारचाकी खाजगी वाहन क्रमांक एमएच 39 एबी 9120 या वाहनांने पीडब्लुडी कार्यालय, षहादा येथे येवून दबा धरुन थांबले. त्यानंतर थोडयाच वेळात मी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांना पीडब्लुडी कार्यालयात भेटायला गेलो असता त्यांची मिटींग चालू असल्याने ते भेटू न षकल्याने मी त्यांनी सांगितलेप्रमाणे सदर कार्यालयातील लिपीक श्री धनसिंग यांना भेटायला गेलो असता त्यांचेषी बोलत असतांनाच मला कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांचा फोन आला व त्यांनी त्यांचे षासकीय निवासस्थानी बोलाविले असता आम्ही पुन्हा सदर निवासस्थानी निघालो. दरम्यान मी प्रत्येक गोष्टीची अपडेट टेक्स्ट मॅसेजव्दारे श्री चौधरी साहेब यांना देत होतो. त्यानंतर मी व पंच नं. 1 श्री धनगर असे श्री महेष पाटील साहेब यांना पैसे देण्यास गेलो असता ठरल्याप्रमाणे 3,50,000/- रूपये दिले व तात्काळ लाच देण्याचा पुर्वनियोजीत इषारा केल्याने श्री चौधरी साहेब, पोनि/वाघ साहेब पंच नं 2 श्री.खेडकर आणि सापळा पथकातील कर्मचारी सक्रीय होवून पीडब्लुडी येथील कार्यकारी अभियंता

यांचे षासकीय निवासस्थानी आलो असता तेथे कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब हजर होते. त्यावेळी आपले सुचनेवरुन पोना/अमोल मराठे यांनी कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांचा डावा हात व पोहवा/विजय ठाकरे यांनी त्यांचा उजवा हात मनगटापासुन घट्ट पकडुन ठेवला. दरम्यान पोना/अमोल मराठे यांनी माझे षर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला लावण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन श्री चौधरी साहेब यांचे ताब्यात दिले. ती वेळ 20.22 वाजेची होती.
त्यानंतर आपण कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांना आपली ओळख श्री राकेष चौधरी, पोलीस उप अधिक्षक, अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार असे सांगून आपले ओळखपत्र दाखवून दोन्ही पंच, व स्टाफ अषांची ओळख करुन दिली.
आपण कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांना त्यांचे नाव, गाव व हुद्दा विचारता त्यांनी त्यांचे नांव महेष प्रतापराव पाटील, वय-51 वर्षे, पद-कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, षहादा जि. नंदुरबार मुळ रा. फ्लॅट नं.203, अश्टविनायक टॉवर, थत्ते नगर, गंगापुर रोड, नाषिक असे सांगितले.
त्यानंतर आपण, आपला स्टाफ व दोन्ही पंचानी मिळून अगोदर त्यांचे राहते षासकीय निवासस्थानाची घरझडती घेतली, त्यानंतर त्यांचे कार्यालयाची व चारचाकी वाहन मारुती सुझुकी कंपनीची सीयाझ मॉडेल असलेली वाहन क्र. एम.एच.39◌ एजे 3690 ची झडती घेतली.
त्यानंतर सदर ठिकाणी पंचनामा करण्यासारखी परिस्थिती नसल्याने आपण खाजगी वाहन तसेच षासकीय वाहन बोलावून घेवुन सदर वाहनांत पंच, आलोसे व स्टाफ असे बसून षहादा पोलीस ठाणे येथे सापळा कारवाईचे सर्व साहित्य घेवून आलेनंतर तेथील एक रुम गोपनीय कामकाजाकरीता मिळणेबाबत पत्र प्रभारी अधिकारी यांचे नावे देवून  देवुन एक स्वतंत्र कक्षाची मागणी केली. त्याप्रमाणे तेथे उपस्थित अधिकारी पोउपनि श्री अहिरे यांनी आपणास एक स्वतंत्र कक्ष उपलब्ध करुन दिला. त्यानंतर आपण मला षहादा पोलीस ठाणेचे बाहेर थांबण्यास सांगितले.
तरी दि. 02/03/2022 रोजी कार्यकारी अभियंता श्री महेष पाटील साहेब यांनी माझे प्रलंबित बिल काढून देण्याचे मोबदल्यात व नविन वर्क ऑर्डर काढून देण्याचे मोबदल्यात 3,50,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारतं◌ाना दिनांक 02/03/2023 रोजी पंच साक्षीदारांसमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे.
तरी यातील महेष प्रतापराव पाटील, वय-51 वर्षे, पद-कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, षहादा जि. नंदुरबार मुळ रा. फ्लॅट नं.203, अश्टविनायक टॉवर, थत्ते नगर, गंगापुर रोड, नाषिक यांनी दिनांक 02/03/2023 रोजी कार्यकारी अभियंता, षासकिय निवासस्थान, षहादा, जि. नंदुरबार येथे भ्रष्ट व बेकायदेषीर मार्गाने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी माझेकडुन 3,50,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच त्यांचे षासकीय निवासस्थानी पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारली म्हणून माझी त्याचेविरुध्द फिर्याद आहे.
माझी वरील लॅपटॉपवर टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहिली असता ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष

हि फिर्याद दिली सही,
दिनांक- 03/03/2023

(राकेष आनंदराव चौधरी)
पोलीस उप अधिक्षक,
अ◌ॅन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rajendra Ganesh More(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): श्री. शैलेश चौधरी सो.

**Rank** (पद): D.Y.S.P. उ.वि.पो.अ. नंदुरबार **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / Informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

विठ्ठल भ्र. त्तापाठिंग) गिरासे

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
शहादा पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajendra Ganesh Mo
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**